पिंपरी चिंचवड महानगरपालिका
लेखा विभाग
क्र.लेखा/२ /कावि/२९७५/२०१७
दि. ८/ १२/२०१७

विषय :- विकास कामांचे निविदेतील रॉयल्टीच्या आकारणीबाबत.

परिपत्रक

विकास कामांच्या अंदाजपत्रकामध्ये रॉयल्टीचा समावेश असतो. सदरची रॉयल्टीची रक्कम महानगरपालिकेमार्फत बीलाद्वारे संबंधीत कंत्राटदारास अदा करून पुनश्च बिलातून त्याची वजावट करून रॉयल्टी रक्कम जिल्हाधिकारी कार्यालयाकडे दरमहा जमा केली जाते.

सदरची रॉयल्टी त्या कामासाठी वापरण्यात येणा-या गौण खनिजाचे परिमाणावर (Quantity) आकारण्यात येत असून त्याचा अंदाजपत्रकात समावेश करून सदरच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता (Technical Sanction ) घेतलेली असते. तांत्रिक मान्यतेच्या रकमेमध्ये रॉयल्टीचा समावेश असतो. व ही रक्कम Schedule 'B' मध्ये समाविष्ट असून ती निविदेसाठी ग्राह्य धरण्यात येते. व त्यानुसार निविदा रकमेवर Percentage Rate पद्धतीने निविदा दर मागविण्यात येतात. परंतु,रॉयल्टीची रक्कम ही कामाचा प्रत्यक्ष भाग नाही. तथापि, रॉयल्टीच्या रक्कमेवरदेखील दर मागविण्यात येतो. याचा कामाच्या परिमाणावर देखील परिणाम होतो. त्याचप्रमाणे State E-DSR 2017-18(PWD) मधील ४.५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे रॉयल्टीचा समावेश Rates मध्ये करू नये अशा सूचना आहेत.

सबब, यापुढे निविदा मागविताना रॉयल्टी रकमेवर दर मागविले जाणार नाहीत. याची काळजी घ्यावी. व प्रत्यक्ष कामाच्या अंदाजपत्रकीय रकमेच्या बेरजेच्या बाहेर मात्र एकूण तांत्रिक मन्यतेच्या रकमेमध्ये रॉयल्टीची रक्कम समाविष्ट करावी.

सबब, यापुढे निविदा प्रसिद्ध करताना वरील प्रमाणे कार्यपद्धती अवलंबावी.

मुख्यलेखापाल
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८

प्रति,

सर्व संबंधीत विभागप्रमुख

प्रत :- मा.आयुक्त

माहितीसाठी सविनय सादर